डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
कृषिनगर, अकोला ४४४ १०४ (महाराष्ट्र)

सूचना का अधिकार

डॉ. स.कृ. ठाकरे
कुलसचिव

Phone No. : 0724-2258372
E-Mail –registrar@pdkv.ac.in

# आदेश

क्र. बीएबी/म.त.नि.स./२०२५/ ८६ दिनांक : २८ फेब्रुवारी, २०२५

१. कामाच्या ठिकाणी होणा-या लैंगिक सतावणुकीस प्रतिबंध करण्यासाठी १९९२ चा रिट विनंती अर्ज (सीआरएल) क्र. ६६६-७० मधील सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या न्यायनिर्णयातील मार्गदर्शक तत्वे भारत सरकारकडून प्रस्तृत करण्यात आली आहेत. या मार्गदर्शक तत्वांची राज्य शासनाने महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियमामध्ये सुधारणा केलेली आहे. त्या सुधारणांची एक प्रत सोबत जोडली आहे. (जोडपत्र-१ व २)

२. लैंगिक सतावणुकीशी संबंधीत तक्रारीचे निवारण करण्यासाठी विद्यापीठ स्तरावर खालील प्रमाणे महिला तक्रार निवारण समितीचे पुनर्गठन करण्यात आलेले आहे.

| अ.क्र. | महिला तक्रार निवारण समितीचे अध्यक्षा / सदस्यांची नाव व पद | पदनाम |
|---|---|---|
| १ | डॉ. वर्षा व्ही. टापरे, सहयोगी प्राध्यापक तथा संचालक मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला | अध्यक्षा |
| २ | डॉ. ओममाला कुंचनवार, सहयोगी प्राध्यापक, कृषि महाविद्यालय, नागपुर | सदस्या |
| ३ | कु. दुर्गा वाघमारे, वेतन व लेखाधिकारी, नागपुर | सदस्या |
| ४ | डॉ. प्रेरणा बी. चिकटे, सहायक प्राध्यापक, कृषि महाविद्यालय, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला | सदस्या |
| ५ | श्री. वैभव फुलाडी, शाखाधिकारी, कुलसचिव कार्यालय, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला | सदस्य |
| ६ | उपकुलसचिव (आस्थापना), डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला | सदस्य |
| ७ | उपकुलसचिव (सा.प्र.वि.), डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला | सदस्य |
| ८ | सहायक कुलसचिव (आस्थापना), डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला | सदस्य सचिव |
| ९ | ॲड. मनीषा नरेन्द्र धुत, २ रा मजला, महानगर पालिका संकुल, रतनलाल प्लॉट चौक, अकोला | एन.जी.ओ.सदस्या |

ज्या कार्यालयाची तक्रार असेल त्या कार्यालयाच्या नियंत्रण अधिका-यांना समितीच्या बैठकीमध्ये बोलविण्यात येईल.

(कृपया, पृ.क्र. २ वर)

३. या समितीच्या कार्यकक्षा खालील प्रमाणे राहतील.

अ) केंद्र शासनाने प्रसिध्द केलेली मार्गदर्शक तत्वे तसेच शासनाने महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियमात सुधारणा केलेल्या सुचनांना म्हणजेच लैंगिक सतावणुकीस प्रतिबंधात्मक उपाययोजनांना प्रसिध्दी देणे.

ब) लैंगिक सतावणुकीच्या तक्रारीची दखल घेणे.

क) तक्रारीत तथ्य आढळून आल्यास त्याबाबतचा शोध घेऊन शिस्तभंगाची कार्यवाही करण्याकरीता विद्यापीठास शिफारस करणे.

ड) शिस्तभंगाच्या कार्यवाहीचा आढावा घेणे.

इ) विद्यापीठाला यासंबंधी केलेल्या कामाचा मासिक अहवाल सादर करणे.

४. विद्यापीठाध्ये काम करणा-या महिला कर्मचा-यांना त्यांच्या तक्रारी वरील समितीच्या अध्यक्षांकडे किंवा सदस्य सचिवांकडे पाठविता येईल. त्या तक्रारी या समितीकडून विचारात घेण्यात येतील व आवश्यक असेल तर सदस्य सचिव ज्या कार्यालयाकडून तक्रार आलेली असेल त्या कार्यालयाच्या प्रमुखांचे अभिप्राय मागवू शकतील व जर तक्रारीमध्ये तथ्य आढळून आले तर संबंधीत कर्मचा-यांच्या विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्याबाबत विद्यापीठाला शिफारस करु शकेल तसेच अशा घटना पुन्हा घडू नयेत म्हणून समिती विद्यापीठाला योग्य ती उपाययोजना सुचवू शकेल.

मा. कुलगुरु महोदय यांच्या मान्यतेने.

सहपत्र : जोडपत्र-१ व २,

Sk

कुलसचिव
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

प्रतिलिपी :

(१) उपकुलसचिव (सामान्य प्रशासन), डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांना माहितीकरीता. तसेच आपणास कळविण्यात येते की, सदर समितीबाबत कार्यालयाच्या दर्शनी भागावर सुचना फलक लावण्याबाबत संबंधीतास योग्य ते निर्देश देण्यात यावे.

(२) प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन माहिती प्रणाली कक्ष, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांना माहितीकरीता. तसेच आपणास कळविण्यात येते की, सदर माहिती विद्यापीठाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

(३) कुलगुरु यांचे स्विय सहायक यांना मा. कुलगुरु महोदय यांचे माहितीकरीता सादर.

(४) ......................................................................यांना माहिती व पुढील कार्यवाहिकरीता अग्रेषित.

602
28/2/2025